# वैश्य सहकारी बँक लि., मुंबई

ESTD. 1945
वैश्य बँक

नोंदणीकृत व प्रशासकीय कार्यालय : युनिट नं. २५-ए (पार्ट), अध्यारु इंडस्ट्रीयल प्रिमायसेस,
स्थापना : १२-११-१९४५ एस्. जे. रोड, सन मिल कम्पाउंड, लोअर परेल (प.), मुंबई - ४०० ०१३. नोंदणी क्र : ९४७५

## ८० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सभासदांना सूचना

वैश्य सहकारी बँक लि., मुंबई या बँकेची ८० वी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५.०० वा., प्राचार्य बी.एन.वैद्य सभागृह, २ रा मजला, इंडियन एज्युकेशन सोसायटीचे राजा शिवाजी विद्या संकुल, गेट नं. १२, पाटकर गुरूजी चौक, हिंदू कॉलनी, दादर (पू.), मुंबई - ४०० ०१४,** येथे होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती. सभेतील कामकाजाचे विषय खालील प्रमाणे आहेत :

१) दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि त्यास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरच्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

३) दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरच्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वैधानिक लेखापरीक्षकांनी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

४) आर्थिक वर्ष २०२३-२०२४ च्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

५) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकाची व पुढील विकासाच्या योजनांची नोंद घेणे व त्यास मंजूरी देणे.

६) आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी समावर्ती / अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळाला देणे.

७) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ करिता वैधानिक लेखापरिक्षणासाठी संचालक मंडळाने मेसर्स एन.बि.एस. आणि कंपनी, सनदी लेखापाल यांच्या पुर्ननियुक्तीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, त्याची नोंद घेऊन मंजूरी देणे.

८) वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

९) माननीय अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

ठिकाण : मुंबई

दिनांक : २४/०७/२०२५

**(भारत अ साळवी)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :** सदर सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झाल्यास उपविधी क्र. ३५(iii) प्रमाणे त्याच ठिकाणी त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता वरील कामांचा विचार करण्याकरीता सभेचे कामकाज सुरु होईल आणि त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

**सभेसंबंधी विशेष सूचना :**

१) वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालकांचा अहवाल आणि ताळेबंद, नफा-तोटा पत्रकाबाबत काही सूचना किंवा जे प्रश्न विचारावयाचे असतील ते सभेपूर्वी सात दिवस म्हणजेच दि. ०५ ऑगस्ट २०२५ पर्यंत बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत लेखी आणून द्यावेत किंवा बँकेच्या अधिकृत ई-मेल ho@vaishyabank.in वर पाठवावेत. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची दखल घेण्याचे बंधन संचालक मंडळावर राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) उपविधी क्र. ३४ (ड) नुसार बँकेच्या वार्षिक अहवालाच्या प्रती सर्व सभासदांना बँकेच्या नजीकच्या शाखेतून अथवा मुख्य कार्यालयातून उपलब्ध केल्या जातील. तसेच सदर अहवाल बँकेच्या www.vaishyabank.com या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

३) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेला अहवाल सभासदांसाठी बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

४) सभासदांनी सभेला येते वेळी नोटीस बरोबर दिलेला उपस्थिती अर्ज सभेच्या प्रवेशासाठी भरून सभेच्या ठिकाणी देणे बंधनकारक आहे.

५) भाग प्रमाणपत्रातील नांव, पत्ता अथवा वारसदार बदल असल्यास संबंधीचे पत्र बँकेच्या शेअर विभागास लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात पाठवावे, त्यानुसार योग्य नोंद करणे शक्य होईल.

६) ज्या सभासदांनी K.Y.C./C.K.Y.C. पूर्तता केली नाही, अशा सभासदांनी दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत पूर्तता करावी.